## शुक्रवार २० जानेवारी २०१२

शुक्रवार दिनांक २० जानेवारी २०१२ रोजी सकाळी १० ते १ या वेळेत गोंधळ, लावणी, पोवाडा, दुपारी २ ते ५ या वेळेत मोहना - बटाव, गण-गळवण-बतावणी-वगनाट्य हे स्थानिक कलावंताचे कार्यक्रम (दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह) लोककलावंत काळ–बाळू व्यासपीठावर सादर करण्यात आले.

दुपारी २ ते ५ या वेळेत २०१० च्या महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवातील अंतिम फेरितील दुसऱ्या क्रमांकाचे 'व्हाईटलायर्स' हे नाटक विष्णुदास भावे नाट्य मंदिर, कै. ॲड. मधुसूदन करमरकर व्यासपीठावर सादर करण्यात आले.

बालगंधर्व नगरीतील नटवर्य कै. गणपतराव बोडस व्यासपीठावर दुपारी २ ते ६ या वेळेस २०११ च्या महाराष्ट्र राज्य संगीत नाट्य महोत्सवातील अंतिम फेरीतील प्रथम क्रमांक पारितोषिक प्राप्त 'संगीत धन्य ते गायनी कळा' हे संगीत नाटक सादर करण्यात आले. सायंकाळी ७.०० वा. -आरंभ ते प्रारंभ" हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

## शनिवार, दि. २१ जानेवारी, २०१२

शनिवार दि. २१ जानेवारी २०१२ रोजी सकाळी १०.०० मुख्य रंगमंचावर संमेलनाचा उद्घाटन सोहळा सुरू झाला. त्यामध्ये स्वागताध्यक्ष आणि वनमंत्री मा.ना.डॉ. पतंगराव कदम यांनी निमंत्रीतांचे स्वागत केले. संमेलनाध्यक्ष श्री. राम जाधव आणि नियोजित अध्यक्ष श्री. श्रीकांत मोघे यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या ९२ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा ज्येष्ठ रंगकर्मी श्री. अमोल पालेकर यांच्या शुभ हस्ते पार पडला. त्यानंतर सायंकाळी ७.०० वाजता अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद बोरिवली शाखेतर्फे कलारंग रजनी हा विविध नाट्यकलाकारांचा सहभाग असलेला कार्यक्रम पार पडला.

त्याच दिवशी दुपारी ४.०० ते ५.३० वाजता. कै. कृ. प्र. खाडिलकर व्यासपीठावर 'राज्य नाट्य स्पर्धा आजचे स्वरूप आणि अपेक्षित बदल' हे चर्चासत्र घेण्यात आले. सायं ५.३० ते सायं. ७.०० या वेळेत कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक निर्मित 'कुसुमाग्रज साहित्य दर्शन' या कुसुमाग्रजांची निवडक नाट्य, कथा, कविता, गीत आणि नृत्याचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

कै. ॲड. मधुसूदन करमरकर व्यासपीठ (विष्णूदास भावे नाट्य मंदिर) येथे दुपारी ३ ते ५ या वेळेत समाजातील उपेक्षित घटकांच्या स्वानुभवावर आधारित 'हम और तुम सब' हे नाटक वेश्या अन्याय मुक्ती परिषद, सांगली यांच्यातर्फे सादर करण्यात आले. त्याचवेळी कै. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व्यासपीठावरून दुपारी २ ते ४ या वेळेत 'आम्हाला नाटक 'अस' हवंय' हे चर्चा सत्र संपन्न झाले. त्यानंतर सायं ५ ते ७ या वेळेत मेघराज शहाजीराजे भोसले प्रस्तुत 'जाऊ तिथे पाहू' हे नाटक सादर करण्यात आले.

नटवर्य कै. गणपतराव बोडस व्यासपीठावरून दु. २ ते ४ या वेळेत 'जिजाऊ' आणि 'हसाल तर शपथ' हे एकपात्री प्रयोग सादर करण्यात आले. दुपारी ४ ते ७ या वेळेत विविध गुणदर्शन / मूकनाट्य हे कार्यक्रम संपन्न झाले.